Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(A)| January - 2026

Original Article

# राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत शिक्षकांची बदलती भूमिका : एक विश्लेषणात्मक अभ्यास

**वैशाली अनिल आडमुठे**
यशवंतनगर हायस्कूल यशवंतनगर, सांगली
**Email:** vaishaliadmuthe1008@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180109
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(A)
Pp. 37-44
January - 2026

**Submitted:** 15 Dec. 2025
**Revised:** 25 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan. 2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे भारतीय शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थी-केंद्रित, कौशल्याधारित, मूल्याधिष्ठित व सर्वसमावेशक बनवणारे क्रांतिकारी धोरण आहे. या धोरणात शिक्षकाला शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू मानले असून त्यांची भूमिका केवळ ज्ञानदातेपणापुरती मर्यादित न राहता मार्गदर्शक, प्रेरणादाता, नवोन्मेषक आणि समाजपरिवर्तनाचा शिल्पकार अशी व्यापक झाली आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, बहुविद्याशाखीय दृष्टिकोन, मूल्यशिक्षण, भावनिक बुद्धिमत्ता, समावेशक शिक्षण आणि जीवनकौशल्यांचा विकास यावर भर देणे आवश्यक ठरते.तथापि, अभ्यासक्रमातील बदल, डिजिटल साक्षरतेचा अभाव, प्रशासकीय कामांचा बोजा, पालकांचा दबाव, विद्यार्थी विविधता आणि मूल्यांचा ऱ्हास ही शिक्षकांसमोरील प्रमुख आव्हाने आहेत. या अडचणींवर मात करण्यासाठी सतत व्यावसायिक प्रशिक्षण, तांत्रिक सुविधा, प्रशासन सुलभीकरण, संशोधन व नवोन्मेषाला प्रोत्साहन, तसेच पालक-समाज-सहभाग यांची गरज आहे.अशा प्रकारे, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची यशस्वी अंमलबजावणी शिक्षकांच्या तयारी, समर्पण आणि सर्जनशीलतेवर अवलंबून असून शिक्षक हेच या धोरणाचा खरा आत्मा व शिल्पकार आहेत.*

***मुख्य शब्द :*** *राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, शिक्षकांची भूमिका, विद्यार्थी-केंद्रित शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, मूल्याधिष्ठित शिक्षण, समावेशक शिक्षण, डिजिटल साक्षरता, बहुविद्याशाखीय दृष्टिकोन, भावनिक बुद्धिमत्ता, जीवनकौशल्ये, शिक्षक प्रशिक्षण, समाजपरिवर्तन.*

## प्रस्तावना

शिक्षण ही मानवी जीवनातील सर्वात प्रभावी आणि परिवर्तनशील शक्ती आहे. समाजाच्या प्रगतीचा पाया हा शिक्षणावर उभा असतो. माणूस शिकत जातो तसा तो केवळ आपले व्यक्तिगत जीवन समृद्ध करत नाही, तर संपूर्ण समाजाला प्रगतीकडे नेतो. म्हणूनच शिक्षण क्षेत्रात योग्य दिशादर्शन करणारी धोरणे, उद्दिष्टे आणि त्याला प्रामाणिकपणे अंमलात आणणारे शिक्षक हे तिन्ही घटक महत्त्वाचे ठरतात. भारतातील शिक्षण क्षेत्राने गेल्या काही दशकांत प्रचंड बदल अनुभवले आहेत. स्वातंत्र्यानंतर शिक्षण हे राष्ट्रनिर्मितीचे प्रभावी साधन म्हणून अधोरेखित झाले. कालानुरूप .राधाकृष्णन आयोग (१९४८-४९), कोठारी आयोग (१९६४-६६), तसेच १९६८ व १९८६ मधील राष्ट्रीय शिक्षण धोरण, समित्या यांनी भारतीय शिक्षणव्यवस्थेला एक ठोस दिशा दिली. तरीही बदलत्या जागतिक वास्तवाशी आणि २१ व्या शतकातील गरजांशी जुळणारे एक सर्वसमावेशक धोरण हवे होते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*वैशाली अनिल आडमुठे, यशवंतनगर हायस्कूल यशवंतनगर, सांगली.*

**How to cite this article:**
*आडमुठे, . वैशाली . अनिल . (2026). राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत शिक्षकांची बदलती भूमिका : एक विश्लेषणात्मक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(A)), 37–44.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18604643*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18604643

म्हणून याच पार्श्वभूमीवर २०२० मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण (National Education Policy – NEP) घोषित झाले. हे धोरण केवळ शिक्षणाची चौकट नव्हे, तर भारताच्या भावी समाजरचनेचे आराखडे घडवणारे आहे. ज्ञान, कौशल्य, मूल्ये आणि जीवनकौशल्य या सर्वांचा समतोल साधत शिक्षण अधिक लवचिक, सर्वसमावेशक आणि व्यक्तिकेंद्री करण्याचा प्रयत्न या धोरणात आहे. या धोरणाचा केंद्रबिंदू म्हणजे शिक्षक. कारण अभ्यासक्रम, तंत्रज्ञान, धोरणात्मक उद्दिष्टे यांचा यशस्वी अंमल फक्त शिक्षकांच्या माध्यमातूनच शक्य आहे. शिक्षक हे केवळ ज्ञानदाते नसून ते विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, प्रेरणादाते आणि समाजपरिवर्तनाचे शिल्पकार आहेत. म्हणूनच राष्ट्रीय शिक्षण धोरणाची खरी कसोटी म्हणजे शिक्षकाची भूमिका, त्यांची बांधिलकी आणि कार्यपद्धती.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

- राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चे सखोल विश्लेषण करणे.
- शिक्षकांच्या बदलत्या भूमिकेचा अभ्यास करणे.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चे योगदान स्पष्ट करणे.
- शिक्षणाला दैनंदिन जीवनाशी जोडण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.
- शिक्षकांसमोरील आव्हानांची उकल करणे.
- सुधारणा व उपाययोजना सुचवणे.
- समाजावर राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा दीर्घकालीन प्रभाव तपासणे.

**गरज व महत्त्व**

शिक्षण हा केवळ ज्ञानार्जनाचा मार्ग नसून तो समाजाला प्रगतीकडे नेणारा आधारस्तंभ आहे. आजच्या जलद गतीने बदलणाऱ्या जगात शिक्षण प्रणाली कालसुसंगत राहणे ही मोठी गरज आहे. म्हणूनच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे केवळ शैक्षणिक सुधारणा नसून सामाजिक परिवर्तनाचे माध्यम आहे.

**१. काळाची गरज**

२१व्या शतकात तंत्रज्ञान, माहितीप्रवाह आणि जागतिकीकरणाने मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवले आहेत. रोजगाराच्या नवीन संकल्पना, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटायझेशन, तसेच नवनवीन कौशल्यांची मागणी वाढत चालली आहे. अशा परिस्थितीत पारंपरिक पाठांतराधारित शिक्षण पुरेसे नाही. विद्यार्थ्यांमध्ये तर्कशक्ती, विश्लेषण क्षमता, सर्जनशीलता आणि आत्मनिर्भरता निर्माण करणे आवश्यक आहे.

**२. विद्यार्थी सक्षम बनविणे**

NEP 2020 चे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना जीवनकौशल्ये, रोजगारकौशल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांची जाण करून देणे. शिक्षण हे केवळ परीक्षेत उत्तीर्ण होण्याचे साधन न राहता जीवनात यशस्वी होण्याचे माध्यम व्हावे, ही या धोरणाची मूलभूत गरज आहे.

**३. दैनंदिन जीवन आणि शिकणे यांची सांगड**

भारतीय शिक्षणात दीर्घकाळ शिकणे आणि जगणे या दोन स्वतंत्र संकल्पना मानल्या गेल्या. परंतु आज विद्यार्थ्यांनी वर्गात जे शिकले ते प्रत्यक्ष जीवनात वापरता आले पाहिजे. पर्यावरण संरक्षण, आरोग्य, आर्थिक साक्षरता, नागरिकशास्त्र, तंत्रज्ञान वापर या जीवनाशी निगडित क्षेत्रांत शिक्षणाचा उपयोग व्हावा, अशी अपेक्षा NEP 2020 व्यक्त करते.

**४. सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व**

भारत हा विविधता असलेला देश आहे. प्रादेशिक भाषा, संस्कृती, कला, परंपरा या सर्वांचा सन्मान राखून जागतिक दर्जाचे शिक्षण देणे ही मोठी जबाबदारी आहे. मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण,

भारतीय परंपरेतील मूल्यांना प्राधान्य, तसेच जागतिक पातळीवरील कौशल्ये आत्मसात करणे, या
संतुलनाची आवश्यकता होती.

**५. शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व**

शिक्षण धोरण कितीही उत्तम असले तरी ते प्रत्यक्षात राबविण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. त्यामुळे शिक्षकांचे प्रशिक्षण, डिजिटल साधनांचा वापर, सर्जनशील अध्यापनपद्धती, तसेच विद्यार्थ्यांशी मानवी नातं निर्माण करण्याची क्षमता यांची आज गरज आहे. शिक्षकांची भूमिका ज्ञानदाते म्हणून न राहता विद्यार्थ्यांना सक्षम, विचारशील आणि मूल्यनिष्ठ नागरिक बनविण्याची आहे. बदलत्या काळानुसार अध्यापन पद्धती, मूल्यदृष्टी आणि सामाजिक जबाबदारी यांची सांगड घालणारा शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू ठरतो.

म्हणूनच, राष्ट्रीय धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शिक्षकांची बदलती भूमिका ही काळाची गरज असून शिक्षणाच्या गुणवत्तेचा पाया आहे.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : एक विहंगावलोकन :-**

भारताचा शैक्षणिक प्रवास हा नेहमीच सतत चिंतन, प्रयोग आणि सुधारणा यांच्या प्रक्रियेतून घडत आला आहे. स्वातंत्र्यानंतर देशाने शिक्षण क्षेत्राला विकासाचा केंद्रबिंदू मानले आणि यासाठी अनेक आयोग व धोरणे अस्तित्वात आली. तरीसुद्धा २१व्या शतकातील बदलत्या सामाजिक, आर्थिक व तांत्रिक परिस्थिती लक्षात घेता शिक्षणामध्ये नवे परिवर्तन आवश्यक होते. जगभरातील प्रचंड वेगवान तांत्रिक क्रांती, जागतिक बाजारपेठेतील स्पर्धा, उद्योजकतेवर आधारित कौशल्यांची वाढती मागणी आणि भारतीय समाजातील विविधतेमुळे शिक्षण अधिक समावेशक, लवचिक आणि व्यवहार्य बनवणे ही काळाची गरज होती. हाच विचार पुढे नेत, जवळजवळ ३४ वर्षांनंतर राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० जाहीर झाले आणि भारतीय शिक्षण क्षेत्रात क्रांतिकारी बदलांची नांदी ठरले.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची उद्दिष्टे**

NEP 2020 चे उद्दिष्ट केवळ अभ्यासक्रम बदलणे नाही, तर शिक्षणाच्या संकल्पनेतच बदल घडवून आणणे आहे. त्याचे मुख्य हेतू खालीलप्रमाणे आहेत :

**१. शालेय शिक्षणातील नवे स्वरूप -** पूर्वप्राथमिक (३ ते ८ वर्षे) - बालकांच्या संज्ञानात्मक व भावनिक विकासासाठी खेळाधारित व अनुभवाधारित शिक्षण. प्राथमिक (८ ते ११ वर्षे) - मूलभूत वाचन, लेखन व गणित कौशल्यांवर भर. माध्यमिक पूर्व (११ ते १४ वर्षे) - प्रकल्पाधारित, कौशल्याधारित आणि प्रयोगाधारित शिकवणी. माध्यमिक उच्च (१४ ते १८ वर्षे) - विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडण्याची लवचिकता.

**२. शिक्षण सर्वांसाठी सुलभ आणि समान करणे -** ग्रामीण, शहरी, आर्थिकदृष्ट्या मागास अशा सर्व स्तरातील मुलांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करणे.

**३. मूलभूत साक्षरता व अंकज्ञान (FLN) विकसित करणे -** प्रत्येक विद्यार्थ्याला इयत्ता तिसरीपर्यंत वाचन, लेखन व गणितातील मूलभूत कौशल्ये अवगत करून देणे.

**४. सर्जनशीलता वाढवणे -** विद्यार्थ्यांना फक्त माहिती पाठ न करता विचार करण्याची, विश्लेषण करण्याची आणि सर्जनशीलतेची क्षमता विकसित करणे.

**५. स्थानिक भाषा व मातृभाषेला प्राधान्य -** प्राथमिक शिक्षण मातृभाषेत दिल्यास विद्यार्थी अधिक आत्मविश्वासाने शिकतात, हे लक्षात घेऊन त्यावर भर देण्यात आला आहे.

**६. बहुविद्याशाखीय व लवचिक शिक्षण -** विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी-निवडींनुसार विषय निवडण्याची संधी, तसेच विविध शाखांचे ज्ञान मिळविण्याची सवलत मिळाली आहे.

**७. समावेशक व मूल्याधिष्ठित शिक्षण -** NEP 2020 हे धोरण फक्त कौशल्यविकासापुरते मर्यादित नाही. त्यात नैतिकता, जबाबदारी, पर्यावरण-जागरूकता आणि भारतीय संस्कृती व परंपरांचा सन्मान या मूल्यांचा समावेश आहे. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी नव्हे तर एक जबाबदार नागरिक म्हणून समाजात भूमिका पार पाडण्यासाठी तयार करणे हा या धोरणाचा मुख्य हेतू आहे.

**८. तंत्रज्ञानाचा वापर -** डिजिटल साधनांचा प्रभावी वापर, ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही पद्धती, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाधारित शिक्षण सामग्री यामुळे शिक्षण अधिक सर्वसमावेशक, लवचिक बनते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण हे फक्त अभ्यासक्रम बदलणारे धोरण नसून, शिक्षणाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन आहे. या धोरणात विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि समाज या सर्व घटकांचा सहभाग मान्य केला गेला आहे. शिक्षण हा केवळ रोजगार मिळवण्याचा मार्ग नसून, जीवन जगण्याची शाश्वत पद्धत, संस्कृतीचे संवर्धन आणि समाजाचे भविष्य घडवणारी प्रक्रिया आहे, हे अधोरेखित करते.

**शिक्षकांचे महत्त्व : भारतीय परंपरेतील दृष्टिकोन**

भारतीय संस्कृतीत शिक्षकाचे स्थान सदैव सर्वोच्च मानले गेले आहे. प्राचीन काळापासून 'गुरु' ही संज्ञा फक्त ज्ञानदाता नसून जीवन मार्गदर्शक, मूल्यसंस्कारक आणि समाजनिर्माता म्हणून गौरवली गेली आहे. प्राचीन गुरुकुल पद्धतीत विद्यार्थ्याला फक्त शास्त्रज्ञानच नव्हे तर जीवनकौशल्य, निसर्गाशी एकरूप होणे, श्रमसंस्कार, आत्मसंयम आणि मूल्यांचे शिक्षण दिले जात असे. शिष्याच्या अंगी सद्गुण,

धैर्य, सत्यनिष्ठा, त्याग, समाजभावना या मूल्यांचा विकास करण्याची जबाबदारी गुरु पार पाडत असे. काळ बदलला, समाजरचना, माध्यमे बदलली, ज्ञानाच्या व्याख्या बदलल्या. गुरुकुल व्यवस्था औपचारिक शालेय शिक्षणात रूपांतरित झाली. तरीही शिक्षकाची भूमिका तितकीच प्रभावी राहिली. 'शिक्षक' हा शब्द केवळ व्यावसायिक पदाचे द्योतक नाही, तर तो समाजाच्या जडणघडणीत निर्णायक भूमिका बजावणाऱ्या व्यक्तिमत्वाचे प्रतीक आहे. मानवतेच्या इतिहासाकडे पाहिले असता, गुरु-शिष्य परंपरेपासून ते आजच्या डिजिटल शिक्षण व्यवस्थेपर्यंत शिक्षकाची भूमिका निरंतर परिवर्तनशील राहिली आहे.

पूर्वी शिक्षक हे ज्ञानाचे स्रोत आणि शहाणपणाचे प्रतीक मानले जात. परंतु एकविसाव्या शतकाने शिक्षण क्षेत्रासमोर नवी आव्हाने निर्माण केली आहेत. माहितीचा विस्फोट, तंत्रज्ञानातील बदल, सामाजिक गुंतागुंत, मानसिक आरोग्याशी संबंधित प्रश्न आणि मुलांच्या बदलत्या जीवनशैलीमुळे आजचे शैक्षणिक जग अत्यंत गुंतागुंतीचे बनले आहे. या परिस्थितीत शिक्षकांची भूमिका केवळ ज्ञानप्रदर्शनापुरती मर्यादित राहिलेली नाही.

आजचा शिक्षक हा मार्गदर्शक, सर्जनशील नेता, भावनिक सहप्रवासी आणि सामाजिक परिवर्तनाचा शिल्पकार बनला आहे. तंत्रज्ञानाने तर शिक्षकाला नवे आयाम दिले आहेत. आज तो डिजिटल साधनांचा उपयोग करून शिक्षण अधिक परिणामकारक आणि समृद्ध करू शकतो. परंतु या तंत्रज्ञानाच्या गर्दीतही मानवी स्पर्श हरवू नये हे सुनिश्चित करणे हीच शिक्षकाची खरी कसोटी आहे.

एकविसाव्या शतकात शिक्षकाची ओळख 'दिशा दाखवणारा दीपस्तंभ' इतकीच राहिलेली नाही, तर आता तो 'दिशा घडवणारा निर्माता' बनला आहे. तो विद्यार्थ्यांना जगण्याची कला शिकवतो, विचार करण्याची क्षमता देतो आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्यासाठी प्रेरित करतो. आजचा शिक्षक म्हणजे ज्ञानाचा वाहक नसून, तो विचारांचा प्रवाह आहे जो प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये सुप्त शक्ती शोधून तिला उजाळा देतो. समाजाचे भवितव्य त्यांच्या हातात आहे, कारण शिक्षक व्यक्तींमधून राष्ट्राची पायाभरणी करतो.

थोडक्यात शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाचा आधारस्तंभ आहे. तणावग्रस्त समाजात मुलांना सहानुभूती, आत्मविश्वास आणि योग्य दिशा देणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे.त्यामुळे शिक्षक हा केवळ अध्यापक नसून तो मार्गदर्शक (Mentor), प्रेरणादाता (Motivator), नवोन्मेषक (Innovator), समाजसंवेदनशील दुवा (Social link) या अनेक भूमिकांतून कार्य करतो.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि शिक्षकाची नवी भूमिका : -**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने भारतीय शिक्षण व्यवस्थेत एक नवे पर्व सुरू केले आहे. यात विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानला गेला असला तरी या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक. म्हणूनच या धोरणाने शिक्षकाच्या भूमिकेत लक्षणीय बदल घडवले आहेत.

**१. मार्गदर्शक आणि प्रेरणादाता**

पूर्वी शिक्षकांचे कार्य मुख्यतः अध्यापनापुरते मर्यादित होते. परंतु आता शिक्षक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शकाची भूमिका निभावतात. केवळ ज्ञान देणे नाही तर विद्यार्थ्याला स्वतः विचार करायला, विश्लेषण करायला आणि निर्णय घेण्यास प्रवृत्त करणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे.

**२. जीवनशिक्षण व कौशल्याधारित शिक्षणाचा दुवा**

NEP 2020 मध्ये 'Foundational Literacy and Numeracy' वर विशेष भर आहे. याचा अर्थ शिक्षकांनी मुलांच्या पायाभूत कौशल्यांची पायाभरणी केली पाहिजे. शिवाय नुसते शैक्षणिक ज्ञानच नव्हे तर संगणक कौशल्ये, संवाद कौशल्ये, समस्या निराकरण ही जीवनकौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे आवश्यक आहे. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण जोपासणे हे शिक्षणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. वर्गात विद्यार्थ्यांना वर्गमंत्री, विद्यार्थी समूह प्रतिनिधी, क्रीडा प्रमुख, सांस्कृतिक विभाग प्रमुख अशा जबाबदाऱ्या देऊन शिक्षक त्यांच्या निर्णयक्षमता, आत्मविश्वास, ताणतणाव समायोजन इ. कौशल्ये अंगी रुजविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**३. तंत्रज्ञान साक्षर**

२१व्या शतकातील शिक्षण डिजिटल साधनांशिवाय अपूर्ण आहे. ऑनलाईन शिक्षण, ई-लर्निंग, स्मार्ट क्लासरूम यामुळे शिक्षकांची भूमिका अधिक आव्हानात्मक झाली आहे. शिक्षकांनी स्वतः तंत्रज्ञानाशी जुळवून घेतले पाहिजे. व्हर्च्युअल क्लासेस, ई-पुस्तके, स्मार्ट बोर्ड, शैक्षणिक ॲप्स, ई-कंटेंट तयार करणे इ. चा दैनंदिन अध्यापन प्रक्रियेत रचनात्मक वापर केला पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन प्रगतीचे मूल्यांकन करणे या बाबतीत शिक्षक दक्ष असणे अपेक्षित आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(A)| January - 2026

**४. विद्यार्थीकेंद्री दृष्टिकोन**

राष्ट्रीय शिक्षण धोरणात प्रत्येक मूल स्वतंत्र व्यक्तिमत्त्व मानले गेले आहे. त्यामुळे शिक्षकांनी सर्व मुलांमध्ये समान क्षमता आहे असे गृहीत धरून त्यांना समान पद्धतीने शिकवणे योग्य नाही. उलट प्रत्येक विद्यार्थ्याची आवड, गती आणि क्षमता लक्षात घेऊन वैयक्तिक पातळीवर शिक्षण देणे ही शिक्षकांची भूमिका आहे.

**५. बहुविद्याशाखीय दृष्टी**

नव्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांना एकाच विषयात बंदिस्त राहून चालणार नाही. विद्यार्थ्यांना कला, क्रीडा, विज्ञान, तंत्रज्ञान, वाणिज्य यांची सांगड घालण्याची मुभा आहे. अशा स्थितीत शिक्षकाला आपली भूमिका बदलावी लागते. फक्त आपल्याच विषयापुरते ज्ञान मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना विविध शाखांशी जोडणारा मार्गदर्शक बनावे लागते.

**६. मूल्यशिक्षण**

राष्ट्रीय शिक्षण धोरण केवळ विज्ञान, तंत्रज्ञान किंवा अर्थव्यवस्थेच्या विकासासाठीनाही, तर जबाबदार नागरिक घडवण्यासाठी आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिस्त, संस्कार, प्रामाणिकपणा, सयंम, सहकार्य वृत्ती, सहिष्णुता; तसेच पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता, राष्ट्रीय एकात्मता, नैतिकता यांसारख्या मूल्यांचे शिक्षण दैनंदिन अनुभवातून, विविध कृतींमधून विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**७. समावेशित शिक्षण**

शाळा म्हणजे समाजाचे प्रतिबिंब. विविध संस्कृती, भाषिक पार्श्वभूमी, आर्थिक स्तर आणि बौद्धिक क्षमता भिन्न असलेल्या विद्यार्थ्यांचा संगम. त्यामुळे शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याकडे संवेदनशीलतेने पाहणे, त्यांच्या भावनिक व सामाजिक गरजा समजून घेऊन त्यांना आत्मविश्वासाने शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे अत्यावश्यक आहे. विशेष गरजा असलेले विद्यार्थी, ग्रामीण पार्श्वभूमीतील मुलं, अल्पसंख्याक गटातील विद्यार्थी या प्रत्येकालाच आपलेपणाची जाणीव देणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे.

**८. भावनिक बुद्धिमत्ता विकसन**

शिक्षण केवळ ज्ञान देण्याची प्रक्रिया नाही; ती विद्यार्थ्यांच्या भावनांशी संवाद साधण्याची कला आहे. आजच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये तणाव, न्यूनगंड, असुरक्षितता आणि एकटेपणा वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत शिक्षकांनी 'भावनिक बुद्धिमत्ता' (Emotional Intelligence - EQ) जोपासणे अत्यंत आवश्यक ठरते.

**९. पालक आणि समाज यांचा सहभाग**

शिक्षक समाजाशी जोडणारा 'दुवा' असतो. जेव्हा पालक, समाज आणि शाळा या तिन्ही घटकांमध्ये सुसंवाद असतो, तेव्हा शिक्षण प्रभावी होत असते. म्हणून शिक्षकांनी नियमित पालकसभा, संवादमाध्यमे आणि स्थानिक कौशल्यांचे सादरीकरण यांद्वारे पालकांना, समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी करून घेतले पाहिजे.

**१०. पर्यावरणाविषयी जागरूकता**

आजचे जग हवामान बदल, जलटंचाई, प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास इ. अनेक पर्यावरणीय संकटांचा सामना करत आहे. या सर्व समस्यांचा दीर्घकालीन उपाय म्हणजे पर्यावरण-जागरूक नागरिकांची पिढी घडवणे. यासाठी स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, जल संवर्धन, प्लास्टिक बंदी मोहीम इ. उपक्रमांद्वारे शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

**११. अविरत शिक्षण**

२१ व्या शतकात ज्ञानाचा, माहितीचा विस्फोट होत आहे. त्यामुळे शिक्षकांचे ज्ञान अद्ययावत असणे गरजेचे आहे. म्हणून सतत शिकणे, वाचन, संशोधन, कार्यशाळा, ऑनलाईनकोर्सेस, प्रशिक्षण, आधुनिक शिक्षण पद्धती या सर्व गोष्टी शिक्षकाच्या व्यावसायिक प्रगतीसाठी आवश्यक आहे. म्हणून 'Learning never stops' ही जाणीव प्रत्येक शिक्षकांनी आपल्यात जोपासली पाहिजे. समावेशिता, संवेदनशीलता, भावनिक बुद्धिमत्ता, सामाजिक समन्वय, नेतृत्व आणि सतत शिकण्याची वृत्ती या सर्व गुणांचा समन्वय असलेला शिक्षकच आजच्या शिक्षणव्यवस्थेचा खरा कणा आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाने शिक्षकाला संपूर्ण शैक्षणिक प्रक्रियेचा केंद्रबिंदू मानले आहे. कारण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांना मूल्याधिष्टित शिक्षण द्यायचे आहे. शिक्षणातील या बदलत्या परिमाणांमुळे शिक्षकाची भूमिका अधिक जबाबदारीची, परंतु तितकीच सर्जनशील आणि आनंददायी झाली आहे.

**शिक्षकांसमोरील आव्हाने**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने शिक्षकाला नवी ओळख दिली असली, तरी या भूमिकेत यशस्वी होण्यासाठी त्याला अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. शिक्षणव्यवस्थेतील संक्रमणकाळात शिक्षकाची जबाबदारी अधिक गुंतागुंतीची झाली आहे.

**१. अभ्यासक्रम व धोरणातील बदलांना सामोरे जाणे**

नवे शैक्षणिक धोरण विद्यार्थीकेंद्री, कौशल्याधारित आणि बहुविद्याशाखीय आहे. त्यामुळे शिक्षकांनी पारंपरिक पद्धतींना मागे टाकून नवीन अध्यापनतंत्र आत्मसात करणे गरजेचे आहे. परंतु काही वेळा अभ्यासक्रमातील वारंवार बदल, प्रशासकीय गुंतागुंत, संसाधनांची कमतरता यामुळे शिक्षक गोंधळून जातात.

**२. डिजिटल साक्षरतेचे आव्हान**

आज शिक्षण तंत्रज्ञानाशिवाय अपूर्ण आहे. स्मार्ट क्लास, ऑनलाइन शिक्षण, डिजिटल मूल्यांकन या सर्व क्षेत्रांत शिक्षकाने निपुण व्हावे लागते. मात्र ग्रामीण भागातील शिक्षकांकडे आवश्यक साधने व प्रशिक्षण नसल्याने त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो.

**३. विद्यार्थी विविध क्षमतेला सामोरे जाणे**

प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो. एखाद्या वर्गात हुशार, मध्यम, तसेच विशेष गरजा असलेले विद्यार्थी असतात. अशा विविधतेला सामोरे जाताना सर्वांना समान संधी मिळेल याची दक्षता घेणे हे मोठे आव्हान आहे.

**४. मूल्यांचा ऱ्हास**

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांचे लक्ष केवळ गुणांवर केंद्रीत झाले आहे. त्यामुळे नैतिकता, आदर्श, समाजसेवा, सहानुभूती यांसारख्या मूल्यांचा लोप होताना दिसतो. शिक्षकांनी  हा ऱ्हास रोखून विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांकडे वळवणे हे कठीण परंतु अत्यावश्यक कार्य आहे.

**५. पालक व समाजाचा दबाव**

शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत पालक व समाजाच्या अपेक्षा प्रचंड वाढल्या आहेत. या  अपेक्षांमुळे शिक्षकांवर अनावश्यक दबाव येतो. शिक्षणाचा मूळ उद्देश, विद्यार्थ्याचा व्यक्तिमत्व विकास  हा बाजूला पडण्याचा धोका निर्माण होतो.

**६. व्यावसायिक प्रगतीतील मर्यादा**

अनेकदा शिक्षकांना सतत प्रशिक्षणाच्या संधी कमी मिळतात. नवी तंत्रज्ञान, संशोधन, कौशल्यविकास यांचा लाभ सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचत नाही. परिणामी नवे धोरण स्वीकारणे कठीण जाते.

**७. प्रशासकीय कामांचा बोजा**

शिक्षक हा अध्यापनाबरोबरच अनेक प्रशासकीय कामांत गुंतलेला असतो. सर्वेक्षण, फॉर्म भरणे, शासकीय अहवाल, परीक्षा कार्यवाही इ. अशैक्षणिक कामांमुळे  अध्यापन, विद्यार्थी विकास व गुणवत्ता याकडे आवश्यक तेवढे लक्ष देता येत नाही. या सगळया आव्हानांचा सामना करताना शिक्षकाला जबाबदारी, संयम आणि आत्मविकासाची गरज आहे. कारण शिक्षणातील क्रांती ही फक्त धोरणपत्रावरून होत नाही, तर ती वर्गखोलीत घडते आणि ती घडवणारा घटक म्हणजे शिक्षक होय.

**उपाययोजना व अपेक्षित बदल**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० प्रभावीपणे राबवायचे असेल तर शिक्षकांना भेडसावणाऱ्या आव्हानांवर ठोस उपाययोजना राबवणे आवश्यक आहे. अन्यथा धोरणाचा आत्मा फक्त कागदोपत्री राहील. खालील काही उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरू शकतात :

**१. शिक्षक प्रशिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण**

शिक्षक हा सतत शिकणारा असला पाहिजे. प्रत्येक शिक्षकाला वेळोवेळी नव्या अध्यापन पद्धती, तंत्रज्ञान, मूल्याधिष्ठान, संशोधन पद्धती यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे. 'Continuous Professional Development (CPD)' ही संकल्पना प्रभावीपणे राबवली गेली पाहिजे. प्रशिक्षण हे फक्त औपचारिक नसून प्रत्यक्ष अध्यापनाशी निगडित, व्यवहार्य व प्रेरणादायी असले पाहिजे.

**२. डिजिटल साक्षरता वाढवणे**

शिक्षकांना संगणक, इंटरनेट, स्मार्ट बोर्ड, शैक्षणिक ॲप्स यांचा वापर करून सोप्या व प्रभावी पद्धतीने शिकवणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील शाळांना आवश्यक तांत्रिक साधनसामग्री पुरवणे, ई-लर्निंगला प्रोत्साहन द्यावे. शिक्षकांनी स्वतः डिजिटल कंटेंट तयार करून विद्यार्थ्यांशी संवाद साधावा.

**३. विद्यार्थी विविधतेसाठी वैयक्तिक मार्गदर्शन**

Remedial Teaching, Peer Learning यासारख्या पद्धतींचा अवलंब करावा. विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी समावेशक शिक्षण (Inclusive Education) देण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण द्यावे. प्रत्येक मुलाच्या गतीनुसार शिकवण्याची लवचिकता शिक्षकांनी आत्मसात करावी.

**४. मूल्यसंवर्धन**

शिक्षकांनी वर्गात वर्तन, आचरणातून मूल्ये दाखवून द्यावीत. पर्यावरण संवर्धन, सामाजिक सेवा, सांस्कृतिक उपक्रम यातून विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक बनवावे. जीवनशिक्षण हा अध्यापनाचा अविभाज्य भाग बनवावा.

**५. प्रशासकीय कामाचा बोजा कमी करणे**

शिक्षकांना अध्यापनावर लक्ष केंद्रित करता यावे म्हणून तांत्रिक साधनांचा वापर करून प्रशासन सुलभ करणे. तसेच अहवाल, नोंदी, माहिती संकलन या प्रक्रियांना डिजिटल पद्धतीने गती देण्यात यावी.

**६. व्यावसायिक प्रगतीची संधी**

शिक्षकांच्या संशोधन प्रकल्पांना प्रोत्साहन द्यावे. उच्च शिक्षण, परिषदा, कार्यशाळा, वेबिनार यांत सहभागी होण्यास प्रोत्साहन व आर्थिक सहाय्य मिळाले पाहिजे. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव व सन्मान करून त्यांना प्रेरणा द्यावी.

**७. पालक व समाज यांचा सहभाग**

पालक-शिक्षक संवाद वाढवणे, परंतु अनावश्यक दबाव टाळणे. समाजातील विविध संस्था, उद्योग, स्थानिक नेते यांना शाळेशी जोडून सामुदायिक शिक्षण घडवणे. शिक्षणाला केवळ परीक्षा-केंद्रित न ठेवता जीवनकेंद्रित बनवण्यासाठी पालकांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

याप्रकारे योग्य प्रशिक्षण, तांत्रिक सुविधा, प्रशासनातील सुलभता आणि सामाजिक सहभाग या उपाययोजनांनी शिक्षकाला नव्या धोरणातील भूमिका यशस्वीरीत्या पार पाडता येईल.

**सूचना व शिफारसी**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी आणि शिक्षकांची नवी भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी खालील सूचना व शिफारसी मांडता येतात :

**१. शिक्षक प्रशिक्षण व व्यावसायिक विकास**

प्रत्येक शिक्षकाला डिजिटल साधनांचा वापर, नवी अध्यापनपद्धती, संशोधन कौशल्ये आणि जीवनकौशल्यांशी निगडित प्रशिक्षण नियमित दिले जावे. शिक्षकांच्या सतत प्रगतीसाठी Continuous Professional Development (CPD) प्रणाली काटेकोरपणे राबवावी.

**२. तंत्रज्ञानाशी मैत्री**

ऑनलाइन व ऑफलाइन शिक्षणाचे संतुलित मिश्रण शिक्षकांनी अंगीकारावे. ग्रामीण भागातील शिक्षकांनाही डिजिटल सुविधा व इंटरनेट सहज उपलब्ध करून द्याव्यात.

**३. स्थानिक भाषा व मातृभाषेला प्रोत्साहन**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मातृभाषेत सुलभतेने शिकवता यावे यासाठी भाषिक प्रशिक्षणाची सोय करावी. भाषांतर, पूरक साहित्य आणि ई-कंटेंट स्थानिक भाषेत सहज उपलब्ध करून द्यावे.

**४. विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोन**

शिक्षकांनी पाठांतरावर भर न देता प्रकल्पाधारित, क्रियाधारित, अनुभवाधारित शिकण्यावर भर द्यावा. विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडी ओळखून त्यानुसार शिकण्याची संधी द्यावी.

**५. मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर**

शिक्षकांनी शिक्षणात नैतिकता, सामाजिक जबाबदारी, पर्यावरण-जागरूकता, आणि भारतीय संस्कृतीचा सन्मान यांचा समावेश करावा. मूल्याधिष्ठित उपक्रम शालेय पातळीवर राबवावेत.

**६. संशोधन व नवोन्मेष प्रोत्साहन**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संशोधनात्मक दृष्टिकोन, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि नवनिर्मितीची जिज्ञासा वाढविण्यास प्रोत्साहन द्यावे. प्रयोगशील शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष पुरस्कार व अनुदान योजना राबवाव्यात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(A)| January - 2026

**७. सर्वसमावेशक शिक्षणाची अंमलबजावणी**

प्रत्येक शिक्षकांनी दिव्यांग विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थी आणि ग्रामीण पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी विशेष लक्ष द्यावे. समावेशक शिक्षणासाठी योग्य साधने, तंत्रज्ञान आणि प्रशिक्षण पुरवावे.

**८. शिक्षक-पालक-समाज सहभाग**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या पालकांशी सातत्याने संवाद साधून शिक्षण प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढवावा. समाजातील स्थानिक तज्ज्ञ, उद्योजक, कलाकार यांना शालेय उपक्रमात सामावून घ्यावे.

**निष्कर्ष**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे केवळ शालेय अथवा उच्च शिक्षणातील बदलापुरते मर्यादित नाही; तर ते भारताच्या भावी समाजाची दिशा निश्चित करणारे एक क्रांतिकारी पाऊल आहे. या धोरणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देतानाच शिक्षकाला केंद्रस्थानी ठेवले गेले आहे. कारण शिक्षणातल्या प्रत्येक बदलाचा अंतिम परिणाम वर्गखोलीत घडतो आणि वर्गखोलीचे वातावरण घडवणारा घटक म्हणजे शिक्षक. नव्या धोरणामुळे शिक्षकांची भूमिका ज्ञानदाते पासून मार्गदर्शक, प्रेरणादाते, नवोन्मेषक आणि समाजसंवेदनशील शिल्पकार अशी विस्तारली आहे. या भूमिकेसोबत शिक्षकांसमोर अभ्यासक्रमातील बदल, तंत्रज्ञानाचा वापर, विद्यार्थी विविधता, पालकांचा दबाव, मूल्यांचा ऱ्हास इ. अनेक आव्हाने आहेत. परंतु योग्य प्रशिक्षण, तांत्रिक साधने, प्रशासकीय सुलभता आणि समाजाचा सहभाग या आधारांवर शिक्षक ही आव्हाने पार करू शकतात. म्हणूनच राष्ट्रीय शिक्षण धोरणाची खरी अंमलबजावणी शिक्षकांची तयारी, समर्पण आणि दूरदृष्टी यांवर अवलंबून आहे.

**समारोप**

शिक्षण ही समाजाच्या प्रगतीची जननी आहे आणि शिक्षक हा त्या समाजाचा खरा शिल्पकार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे भारतीय शिक्षणाला नवे आयाम देणारे ऐतिहासिक पाऊल आहे. मात्र या धोरणाची खरी कसोटी धोरणाच्या कागदोपत्री मांडणीत नसून ती शिक्षकांच्या कृतीतून, त्यांच्या कार्यपद्धतीतून आणि त्यांच्या दृष्टीकोनातून दिसून येणार आहे. आजचा शिक्षक केवळ पाठ्यपुस्तक शिकवणारा अध्यापक नाही, तर तो विद्यार्थ्यांचा भावनिक आधार, त्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा मार्गदर्शक, तसेच नव्या भारताची पायाभरणी करणारा निर्माता आहे. शिक्षकांच्या हृदयातील करुणा, ज्ञानातील प्रामाणिकपणा आणि अध्यापनातील सर्जनशीलता हीच राष्ट्रीय शिक्षण धोरण यशस्वी करण्याची खरी गुरुकिल्ली आहे. तंत्रज्ञान, संशोधन, कौशल्यविकास, मूल्याधिष्ठान आणि सांस्कृतिक वारसा या सर्व घटकांचा सुंदर संगम शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना देऊ शकतो. यामुळे तो केवळ माहिती पुरवणारा न राहता मूल्यनिर्मिती करणारा, कौशल्य विकसित करणारा आणि समाजाला दिशा देणारा विचारवंत ठरतो. समाजाला केवळ सुशिक्षित नागरिक नको आहेत, तर सुसंस्कृत, जबाबदार, मूल्यनिष्ठ आणि समंजस नागरिकांची गरज आहे. अशा नागरिकांची निर्मिती करण्याची क्षमता शिक्षकांमध्ये दडलेली आहे. म्हणूनच शिक्षकाची भूमिका ही केवळ राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा एक भाग नसून त्या धोरणाचा आत्मा आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे एक परिवर्तनशील, भविष्यदर्शी आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन असलेले धोरण आहे. या धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थी-केंद्रित, जीवनाशी निगडित आणि मूल्याधिष्ठित शिक्षण प्रणाली निर्माण करण्याची संधी आपल्यासमोर उभी आहे. पण या संधीचे रूपांतर वास्तवात करण्यासाठी शिक्षकांची निष्ठा, सर्जनशीलता आणि समाजाविषयीची बांधिलकी आवश्यक आहे. त्यामुळे असे म्हणता येईल की NEP 2020 हे धोरण आहे, परंतु त्याला वास्तवात आणणारा शिल्पकार म्हणजे 'शिक्षक'.

**संदर्भ सूची**

1. भारत सरकार, शिक्षण मंत्रालय - राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, नवी दिल्ली.
2. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण - शिक्षक मार्गदर्शिका
3. www. Education.gov.in.